0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक ०१/०३/२०१३ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१३/२०१३/जा.१६५, दिनांक ०२/०३/२०१३.

३) मे. राज ऑईल अँड सोप सेंटरचे मालक सलीम हाजीभाई अगवान यांचे दि. १२/०३/२०१३ रोजीचे निवेदन.

४) पोलिस उपनिरिक्षक, जोगेश्वरी पोलिस ठाणे यांचे दिनांक १३/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

५) अन्न व औषध प्रशासन विभाग, वांद्रे, मुंबई यांचे पत्र क्र. एफटीएल/एफडीओ/३१/१३ अन्वये दक्षता शाखेकडून दिनांक ०२/०५/२०१३ रोजी प्राप्त प्राप्त पृथःकरण अहवाल.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१३/२०१३/जा.४८८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.

दिनांक : ३१ / ०५ /२०१३.

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक १५/०२/२०१३ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयातील फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह सायंकाळी सुमारे ०५.१५ वाजता मे. राज ऑईल अँड सोप सेंटर, शॉप नं. १, गजधर प्लाट, बी.एम.सी. मार्केट, नवलकर वाडी, जोगेश्वरी स्टेशन जवळ, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई या गाळयात प्रवेश केला. तेथे काऊंटरवर एक इसम बसला होता. अधिकाऱ्यांनी सदर इसमास त्यांची ओळख करुन दिली व भेटीचे प्रयोजन सांगितले. अधिकाऱ्यांनी सदर इसमास त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव सलीम हाजीभाई अगवान असे सांगितले.

अधिकाऱ्यांनी सदर गाळयामध्ये कोणता व्यवसाय चालतो याविषयी विचारणा केली असता, सलीम हाजीभाई अगवानने सांगीतले की, तो सदर दुकानाचा मालक असून, दुकानामध्ये साबन, स्टेशनरी साहीत्य व तेल इ. किरकोळ विक्री करतो. तो खाद्यतेल, तांदुळ, डाळी, कडधान्य व साखर यांचा परवानाधारक आहे. तो मे. राज ऑईल अँड सोप सेंटर या नावाने सन २००२ पासून खाद्यतेलाचा व सोपचा किरकोळ व्यवसाय करीत असून व्यवसायाकरीता लागणारे पामतेल व शेंगदाणा तेल मे. ऑईल वेल ऑईल सेंटर, गोवंडी, मुंबई या व्यापाऱ्याकडून १८० लिटर क्षमतेच्या बॅरलमधून खरेदी करुन ते गाळ्यातील पोटमाळ्यामध्ये असलेल्या दोन स्वतंत्र लोखंडी टाकीमध्ये साठवणूक करुन त्याची ग्राहकांना किरकोळ (सुटी) विक्री करतो. तसेच सनफ्लावर, शेंगदाणा, तीळतेल हे सफोला, फार्च्युन, रीसो, प्रीमोओ, मुरली, गोदरेज, धारा, स्विकार इ. या नामांकीत कंपनीच्या वितरकाकडून १ लिटर, ५ लिटर, १५ लिटर प्रमाणे कंपनीच्या पॅक केलेल्या पाऊच/डबा या स्वरुपात खरेदी करुन त्याची ग्राहकांना विक्री करीतो, असे पंचासमक्ष अधिकाऱ्यांना सांगितले.

अधिकाऱ्यांनी सलीम हाजीभाई अगवान यांचेकडे खाद्यतेलाच्या साठवणुकीसाठी आवश्यक असलेल्या शिधावाटप विभागाच्या परवान्याविषयी व इतर कागदपत्राविषयी विचारणा केली असता, त्यांनी सांगीतले की, त्यांचेकडे मे. राज ऑईल ॲण्ड सोप सेंटर या ट्रेड नावाचा खाद्यतेलाचा घाऊक परवाना क्र. २६/ड/आर/९ वैधता दिनांक ३१.१२.२०१४ असल्याचे सांगून सदर अनुज्ञाप्ती सादर केली. अधिकाऱ्यांनी साठा पुस्तक/रोख विक्री पावती पुस्तक/विक्री नोंदवही/पाक्षिक/मासिक विवरणपत्र इ. दस्तऐवजाची तपासणीसाठी मागणी केली असता, त्यांनी शिधावाटप कार्यालयाकडून प्रमाणित केलेले साठा पुस्तक व परिमंडळ कार्यालयात सादर केलेले मासिक विवरणपत्र पंचासमक्ष सादर केले.

अधिकाऱ्यांनी साठा पुस्तकाची पडताळणी केली असता, साठेपुस्तकामध्ये खाद्यतेलाची विविध प्रकारची आवक व विक्रीची नोंद स्वतंत्रपणे नमुद केली असल्याचे आढळून आले. तथापी, दिनांक १२.०२.२०१३ ते १४.०२.२०१३ कालावधीतील नोंदी साठा पुस्तकात घेतले नसल्याचे आढळले. तसेच दिनांक ०१.०२.२०१३ पासूनचे खरेदी बिले तपासली असता, दिनांक ०८.०२.२०१३ रोजीचे वनस्पतीचे ३७५ किलोचे व दिनांक ०९.०२.२०१३ रोजीचे रिफाईंड तेल ३७५ लिटरचे बिले तपासणीकरीता सादर केले नाही.

परवानाधारकाने त्यांच्या साठा पुस्तकात दिनांक ०१.०२.२०१३ ते दिनांक १२.०२.२०१३ पर्यंत खाद्यतेलाची झालेली आवक विक्री तपशील खालीलप्रमाणे.

| खाद्यतेलाचा प्रकार | सुरवातीची शिल्लक (दि.०१.०२.१३) | आवक | एकूण | विक्री | दि. १२.०२.१३ ची शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| शेंगतेल | २३० | ३६० | ५९० | ३९० | २०० |
| रिफाईंड तेल | ७९० | ३७५ | ११६५ | ६१५ | ५५० |
| खोबरेल तेल | १८० | --- | १८० | ४५ | १३५ |
| पामतेल | ७०५ | ७२० | १४२५ | ५१० | ५५५ |
| राईतेल | २४५ | ७५ | ३२० | ७५ | १७० |
| तीळतेल | ४५० | --- | ४५० | १३५ | ३१५ |
| एकूण | | १५३० | | १५०० | १९२५ |
| वनस्पती | १४५ | ३७५ | ५२० | १३५ | ३८५ |

सलीम हाजीभाई अगवान यांनी ते ग्राहकास/खरेदीदारास त्यांचे ट्रेड नाव, पत्ता, अनुज्ञप्ती क्रमांक, दिनांक, परिमाण, दर, किंमत, व्हॅट तसेच ग्राहकाचे नाव व पत्ता इ. तपशिल नमुद असलेली कोणतीही रोख पावती/बिल देत नसल्याचे सांगून रोख पावती पुस्तक तसेच बिल बुक सादर केले नाही. तसेच भेटीच्या वेळी भाव फलक व साठा फलक लावलेला नसल्याचे अधिकाऱ्यांना पंचासमक्ष आढळून आले.

अधिकाऱ्यांनी परवानाधारक सलीम हाजीभाई अगवान यांचेसमक्ष गाळयातील साठ्याची मोजदाद केली असता, त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आढळला:

सदर दुकानाच्या वरच्या मजल्यावर लोखंडी चौकोनी आकाराच्या दोन टाक्यां ठेवल्या असून, त्यामधून पाईपद्वारे सुटे तेल विक्रीसाठी काढले जाते. सदर टाक्यांचे कोणतेही कॅलीब्रेशन चार्ट परवानाधारकाकडे नाही. त्यामुळे टाक्यातील तेलाचे मोजपाप करण्याकरीता प्रथमत: सदर टाक्यांचे मोजमाप टेपच्या सहाय्याने घेण्यात आले. टाकी क्र. १ व २ ची लांबी, रुंदी, उंची मोजण्यात आली व प्रचलीत पध्दतीनुसार टाकीचे क्षेत्रफळ काढले. त्यावरुन टाकीची क्षमता काढण्यात आली. तसेच टाकीतील तेलाची याच पध्दतीप्रमाणे मोजमाप घेऊन तेलाचे क्षेत्रफळ घेऊन म्हणजेच तेलाचा साठा लिटरमध्ये काढण्यात आला. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे,

| अ. क्र. | टाकी कमांक | लांबी x रुंदी x उंची इंच | टाकीचे क्षेत्रफळ घन इंच | टाकीचे क्षेत्रफळ लिटर | टाकीतील तेलाची लांबी x रुंदी x उंची इंच | टाकीतील तेलाचे क्षेत्रफळ घन इंच | टाकीतील तेलाचे क्षेत्रफळ लिटर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | ४८ x ४८ x ४८ | ११०५९२ | १८१२ | ४० x ४८ x ४८ | ९२१६० | १५१० |
| २ | २ | ४८ x ४८ x ४८ | ११०५९२ | १८१२ | ३८ x ४८ x ४८ | ८७५५२ | १४३५ |
| एकूण | | | | ३६२४ | | | २९४५ |

0004

तसेच, दरम्यान अधिकाऱ्यांनी जोगेश्वरी पोलीस स्टेशन, जोगेश्वरी येथे संपर्क साधून घटनेची माहिती कळविली. तद्नंतर दुकानात प्रत्यक्ष असलेला विविध कंपन्यांचा पाऊच/डब्यामध्ये/कार्टूनमध्ये पॅक असलेल्या साठ्याची मोजदाद केली.

जप्त केलेल्या मुद्देमालाचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ. क्र. | तपशिल/ब्रॅण्ड | परिमाण | संख्या | एकूण तेल / वनस्पती लि. | बाजारभावाप्रमाणे अंदाजे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | दर/लि. | किमत रुपये |
| १ | टाकी क्र. १ मधील सुटे तेल पामोलीन | १५१० | १ | १५१० | ६० | ९०,६००/- |
| २ | टाकी क्र २ मधील सुटे तेल शेंगदाना तेल | १४३५ | १ | १४३५ | ९० | १,२९,१५०/- |
| ३ | फाच्युन सनलाइट टीन सुर्यफल | १५ | ६० | ९०० | ९० | ८१,०००/- |
| ४ | फाच्युन सनलाइट कार्टून सुर्यफल | १२ | १२ | १४४ | ९० | १२,९६०/- |
| ५ | संडे कार्टून सुर्यफल | १२ | ८ | ९६ | ९० | ८,६४०/- |
| ६ | मुरली कापूस तेल | १२ | २५ | ३०० | ९० | २७,०००/- |
| ७ | गोदरेज सुर्यफल कार्टून | १५ | १२ | १८० | ९० | १६,२००/- |
| ८ | नॅचरल शेंगदाना तेल टीन | १५ | १० | १५० | ९० | १३,५००/- |
| ९ | संडे कार्टून सुर्यफल | १२ | ९ | १०८ | ९० | ९,७२०/- |
| १० | सफाला गोल्ड इडिबल तेल कार्टून | १२ | १५ | १८० | ९० | १६,२००/- |
| ११ | टेस्टी गोल्ड मस्टर्ड तल टीन | १५ | ८ | १२० | ९० | १०,८००/- |
| १२ | फाच्यु सनलाइट कार्टून सुर्यफल | १ | २० | २० | ९० | १,८००/- |
| १३ | जेमीनी सुर्यफल | ५ | ६ | ३० | ९० | २,७००/- |
| १४ | धारा राईस ब्रान तेल | ५ | २ | १० | ९० | ९००/- |
| १५ | सोयाबीन तेल | ५ | ४ | २० | ९० | १,८००/- |
| १६ | संडे कार्टून सुर्यफल | ५ | ८ | ४० | ९० | ३,६००/- |
| १७ | सफाला इडीबल तेल कार्टून करडी | ५ | ६ | ३० | ९० | २,७००/- |
| १८ | सफाला गोल्ड इडिबल तेल कार्टून करडी | ५ | ६ | ३० | ९० | २,७००/- |
| १९ | सनफ्लावर ऑईल | ५ | ४ | २० | ९० | १,८००/- |
| २० | रिसो राईस ब्रान ऑईल | ५ | २ | १० | ९० | ९००/- |
| २१ | फार्च्युन राईस ब्रान ऑईल | ५ | २९ | १४५ | ९० | १३,०५०/- |
| २२ | स्वीकार सनफ्लावर ऑईल | ५ | ९ | ४५ | ९० | ४,०५०/- |
| २३ | सफाला इडीबल तेल पाऊच करडी | २ | ९ | १८ | ९० | १,६२०/- |
| २४ | सफाला इडीबल तेल पाऊच करडी | १ | १० | १० | ९० | ९००/- |
| २५ | फार्च्युन राईस ब्रान ऑईल | १ | ६० | ६० | ९० | ५,४००/- |
| २६ | प्रिमीओ शेंगदाना तेल | १ | १० | १० | ९० | ९००/- |
| २७ | क्लासीक शेंगदाना तेल | १५ | १ | १५ | ९० | १,३५०/- |
| २८ | मुरली कापूस तेल | १५ | १ | १५ | ९० | १,३५०/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २९ | रिफाइन तेल | १५ | ९ | १३५ | ९० | १२,१५०/- |
| ३० | सुटे तल | १५ | ५ | ७५ | ६० | ४,५००/- |
| ३१ | कॉनड्राप मकई तेल टीन | १५ | १५ | २२५ | ८० | १८,०००/- |
| ३२ | गोदरेज वनस्पती | १ | १४ | १४ | ८० | १,१२०/- |
| ३३ | गोदरेज वनस्पती | ०.५ | २४ | १२ | ८० | ९६०/- |
| ३४ | गोदरेज वनस्पती | ०.२५ | ४ | १ | ८० | ८०/- |
| ३५ | डालडा वनस्पती | १ | २४ | २४ | ८५ | २,०४०/- |
| ३६ | डालडा वनस्पती | ०.५ | २० | १० | ८५ | ८५०/- |
| ३७ | अमुल, सागर, विजया, कृष्णा वनस्पती | १ | ३५ | ३५ | ८५ | २,९७५/- |
| ३८ | सागर घी | १ | ६ | ६ | २८० | १,६८०/- |
| ३९ | सागर घी | ५ | ३ | १५ | २८० | ४,२००/- |
| ४० | अमुल घी | १ | ५ | ५ | २८० | १,४००/- |
| ४१ | अमुल घी | २ | ४ | ८ | २८० | २,२४०/- |
| ४२ | अमुल घी | ५ | १ | ५ | २८० | १,४००/- |
| ४३ | कृष्णा घी | ५ | ५ | २५ | २८० | ७,०००/- |
| | एकूण | ३२१९.२५ | ५२२ | ६२४६ | | ५,२३,८८५/- |

अशाप्रकारे सदर दुकानात असलेला एकूण खाद्यतेल व वनस्पती साठा वर दर्शविल्याप्रमाणे ६२४६ लिटर म्हणजेच ५६८३.८६ कि.ग्रॅ आहे. परवानाधारक यांचेकडे असलेल्या परवान्यावर नमुद प्रमाणे त्यांना ४००० कि.ग्रॅ. ची मर्यादा आहे. परंतु प्रत्यक्षात ५६८३.८६ कि.ग्रॅम म्हणजेच परवान्यातील मर्यादेपेक्षा १६८४ कि.ग्रॅम इतका खाद्यतेल व वनस्पती साठा जास्त आहे.

याबाबत परवानाधारक सलीम हाजीभाई अगवान यांचेकडे विचारणा केली असता, त्यांनी सांगीतले की, सुट्या तेलाची विक्री करीत असल्यामुळे निश्चित अंदाज आला नाही. म्हणून वरील प्रमाणे जास्त तेल साठा राहीला आहे. त्याप्रमाणे अधिकाऱ्यांनी तपासणीत आढळून आलेल्या दोषाबाबत व जास्त आढळून आलेल्या खाद्यतेलाच्या साठ्याबाबत सलीम हाजीभाई अगवान यांचा जबाब नोंदविण्यात आला. दरम्यान घटनास्थळी पोलीस उप निरीक्षक श्री. जाधव, जोगेश्वरी पोलीस स्टेशन हे हजर झाले. त्यांना घटनेची रितसर माहिती अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष दिली.

परवानाधारकाकडे त्याच्या व्यवसायाच्या पत्त्यावर साठवणूक केलेल्या खाद्यतेलाचे नमुने रासायनिक पृथ:करणासाठी घेण्यात आले. प्रत्येकी साठयातून ४ असे १ लि. क्षमेतेच्या पारदर्शक प्लॅस्टीकच्या स्वच्छ व रिकाम्या बाटल्यांमध्ये पंचासमक्ष व परवानाधारक यांचेसमक्ष नमुने घेण्यात आले आणि ते सिलबंद करण्यात आले.

सदर दुकानात असलेला खाद्यतेल, वनस्पतीचा प्रत्यक्ष एकूण ६२४६ लिटर साठा जप्त करण्यात आला. सदर सुटा व पॅक केलेला खाद्यतेल, वनस्पतीचा साठा प्रत्यक्षात हलविणे शक्य नाही. तो ठेवण्यासाठी

परवानाधारकाकडे वेगळे गोदाम उपलब्ध नाही. त्यामुळे सदर साठा जागीच जप्त करुन मे. राज ऑईल ॲण्ड सोप सेंटरचे मालक संलीम हाजीभाई अगवान यांचे ताब्यात पोलीस उप निरीक्षक श्री. जाधव यांचे समक्ष देण्यात आला व पुढील आदेशापर्यंत सदर साठा आहे त्याच स्थितीत जैसे थे जतन करुन ठेवावा अशी सुचना त्यांना देण्यात आली.

अशाप्रकारे, मे. राज ऑईल ॲण्ड सोप सेंटरचे मालक सलीम हाजीभाई अगवान यांनी खाद्यतेलाच्या परवान्यावरिल अटी/शर्तीनुसार रोख विक्री पावती पुस्तक/विक्री नोंदवही ठेवलेली नाही, साठे साठेपुस्तकामध्ये परिपुर्ण नोंदी घेतलेल्या नाहीत. परवानाधारक ग्राहकास/खरेदीदारास त्यांचे ट्रेड नाव, पत्ता, अनुज्ञप्ती क्रमांक, दिनांक, परिमाण, दर, किंमत, व्हॅट तसेच ग्राहकाचे नाव व पत्ता इ. तपशिल नमुद असलेली कोणतीही रोख पावती/बिल देत नसल्याचे आढळून आले. रोख पावतीची स्थळ प्रत ठेवणे हे अनुज्ञप्तीधारकास बंधनकारक असतांना त्याने त्याचे उल्लंघन केल्याचे अधिकाऱ्यांना प्रथदर्शनी दिसून आले. तसेच खाद्यतेल ज्या टाक्यांमध्ये साठविले जाते त्या टाक्यांवर आतमध्ये असलेल्या तेलाचे नाव नमुद नाही. गाळयाच्या दर्शनी भागी साठाफलक व भावफलक लावलेला नाही. परवानाधारकाने तपासणीच्या वेळी दिनांक ०८.०२.२०१३ रोजीचे वनस्पतीचे ३७५ किलोचे व दिनांक ०९.०२.२०१३ रोजीचे रिफाईंड तेल ३७५ लिटरचे खरेदी बिल तपासणीकरिता सादर केले नाही. तसेच त्यांच्याकडे असलेल्या खाद्यतेलाच्या किरकोळ परवान्यासाठी विहीत केलेल्या कमाल साठवणूक मर्यादेपेक्षा अतिरिक्त खाद्यतेलाची साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक केल्याने जीवनावश्यक वस्तु असलेल्या खाद्यतेलाची कृत्रीम टंचाई निर्माण होऊन स्थानीक बाजारपेठेत भाववाढीस प्रोत्साहन दिल्याचे सकृतदर्शनी दिसून आले. नोंद न ठेवता सुटे तेलाचा साठा करुन त्यामध्ये इतर तेलामध्ये पामोलीन तेल मिसळून, भेसळ करुन ग्राहकांना विक्री करीत असल्याचे प्रथम दर्शनी दिसून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याने, संबंधिताविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० तसेच महाराष्ट्र अनुसूचित वस्तू किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९७९ च्या आदेशाचे व आदेशाच्या अनुषंगाने दिलेल्या अनुज्ञप्तीतील अटी व शर्तीचा भंग केल्याने त्यांचेविरुद्ध जोगेश्वरी पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ०३/२०१३, दिनांक १६/०२/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट

करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक १२/०३/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक १२/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे. राज ऑईल अँड सोप सेंटरचे मालक सलीम हाजीभाई अगवान यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ३ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी हे उपस्थित राहिले नाहीत.

अन्न व औषध प्रशासन विभाग, वांद्रे, मुंबई यांचेकडून वाचावे क्र. ५ अन्वये प्राप्त झालेल्या रासायनिक पृथ:करण अहवालामध्ये, " and I am of the opinion that above Samples No W-08, W-14, W-28 and Q-70 confirm to the standards of Palm Oil and Groundnut Oil as per Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulation 2011 with respect to above parameters.", असे नमूद आहे.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

**<u>युक्तिवाद</u> :-**

दिनांक १२/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. राज ऑईल अँड सोप सेंटरचे मालक सलीम हाजीभाई अगवान यांनी युक्तीवाद केला की, मे. राज ऑईल अँड सोप सेंटर शॉप नं. १, गजधर प्लाट, बी. एम. सी. मार्केट, नवलकरवाडी, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई - ६० नावे किरकोळ खाद्यतेलाचा व्यवसाय परवाना क्र. २६-ड-९ असून तो २०१४ पर्यंत विधीग्राह्य आहे. सदर परवाना खाद्यतेलाची किरकोळ विक्री करत आहे. त्याचे दुकानात दिनांक १५/०२/२०१३ रोजी आपल्या कार्यालयातील फिरते पथकांनी भेट देऊन परवाना व दुकानाची तपासणी केली. तपशिल आढवलेल्या तेलाबाबत तो पुढील प्रमाणे खुलासा देत आहे. १) दिनांक १२/०२/२०१३ ते १४/०२/२०१३ ह्या दोन दिवसाचे साठावही त्याच्या (बहीणीची मुलगी) भाचीचे हळदीचे कार्यक्रमामुळे साठावहीत लिहिण्याचे राहिले. लिहिण्याचे काम तो स्वत: करत असल्याने ते राहून गेले. २) दिनांक ०८/०२/२०१३ रोजीचे वनस्पतीचे ३७५ किलोचे दिनांक ०९/०२/२०१३ रोजी सनफ्लावर रिफाईन तेल ३७५ लिटरचे बिल सादर करु शकलो नाही. कारण माल आल्यानंतर बिल दोन ते तीन दिवसानंतर तेलाचे दलालामार्फत पोहचवले जातात ते दोन्ही बिल तो सादर करीत आहे. ३) ग्राहाकांना बिल देणे आवश्यक आहे. परंतू त्याच्या दुकानात अतिकिरकोळ ग्राहक हा अत्यंत गरीब असल्यामुळे विक्री अत्यंत किरकोळ स्वरुपाचे असल्यामुळे त्याबाबतची बिले तयार केली

गेलीOविहीत. त्यामुळे तो सादर करु शकला नाही. आता यापुढे बिलबुक व्यवस्थीत ठेवण्याची हमी देतो. ४) तो कायद्यानुसार वॅट भरत आहे. त्यांची पावती निवेदनासोबत जोडली आहे. ५) आपल्या अधिकाऱ्यांनी तपासणीच्यावेळी खाद्यतेल व वनस्पती त्यांच्यामध्ये पामऑईल, ई-सन फ्लावर तसेच प्योर घी, अमूल, सागर, कृष्णा, विजया हे पदार्थ परवानात मोजणी करताना त्याचा समावेश हा साठामध्ये केल्यामुळे मर्यादापेक्षा १६८४ लि. इतका खाद्यतेल व वनस्पती तेल साठा जास्त नमूद केलेले आहे. ६) वर नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३, मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०००३२ दिनांक ९ मे, २००८ चे अनुक्रमांक ६ प्रमाणे शासनाने लागू केलेल्या गहू, तांदूळ, खाद्यतेल व खाद्यतेल बिया यांच्या साठा मर्यादेबाबत लागू केंलेले निर्बंध हे ह्या वस्तू आयात केल्यास त्यावर लागू राहणार नाही. जर त्यामधून पामऑईल, ई-सनफ्लावर तसेच शुध्द घीचा नमूद केलेला साठा वगळण्यास सदरचा साठा मर्यादेच्या आत आहे ते स्पष्ट होते. त्यामुळे आपल्या अधिकाऱ्यांनी केलेली कार्यवाहीनुसार जप्त केलेला मुद्देमाल मुक्त करावा. त्यामुळे तो परवानातील वरील अटी व शर्तीचे पालन करीत नाही ते म्हणणे रास्त नाही. तसेच त्याला खाद्यतेल व वनस्पती तेलाचा व्यवसाय करण्याची अनुमती द्यावी. ७) वर नमुद केल्याप्रमाणे त्याचा व्यवसाय हा विहीत केलेल्या मर्यादेमध्येच असल्याचे तो स्पष्ट करीत आहे. त्यामुळे मर्यादे पेक्षा जास्त साठेची साठवणूक करुन कृत्रिम टंचाई निर्माण होऊन स्थानिक बाजारपेठेत भाववाढीस प्रोत्साहन दिल्याबाबतचे म्हणणे संयुक्तीक नाही. तसेच तेलाचा व्यवसाय हा त्यांचा पारंपारीक असून त्यांचा ग्राहक हा सुध्दा ठरलेल्या असल्यामुळे तेलामध्ये भेळसेळ करुन विक्री केली जाते हे म्हणणे सुध्दा अनाठाई आहे, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

पोलिस उपनिरिक्षक, जोगेश्वरी पोलिस ठाणे यांचे दिनांक १३/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, नमूद गुन्ह्यातील आरोपी नामे सलीम हाजीभाई अगवान यास दिनांक २७/०२/२०१३ रोजी अटक करण्यात आली असून मा. न्यायालयाने १५,०००/- रुपयाचे जामिनावर सोडण्यात आले आहे. नमूद गुन्ह्याचे साक्षीदारांचे जबाब नोंद करीत असून नमूद गुन्ह्याचे संदर्भाने पंचनाम्याअंतर्गत ताब्यात घेण्यात आलेले तेलाचे नमुने याचा अहवाल प्राप्त करीत आहोत. तसेच आपले कार्यालयाकडून नोटीस प्राप्त झाले असून उपरोक्त गुन्ह्यातील संबंधीत आरोपीतास नोटीसची बजावणी करण्यात आली आहे. नमुद गुन्ह्यात मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असून पुढील आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक १५/०२/२०१३ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयातील फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह मे. राज ऑईल अँड सोप सेंटर, शॉप नं. १, गजधर प्लाट, बी.एम.सी. मार्केट, नवलकर वाडी, जोगेश्वरी स्टेशन जवळ, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई या गाळ्यात प्रवेश करुन तपासणी केली असता, मे. राज ऑईल ॲण्ड सोप सेंटरचे मालक सलीम हाजीभाई अगवान यांनी खाद्यतेलाच्या परवान्यावरिल अटी/शर्तीनुसार रोख विक्री पावती पुस्तक/विक्री नोंदवही ठेवलेली नाही, साठे साठेपुस्तकामध्ये परिपुर्ण नोंदी घेतलेल्या नाहीत. परवानाधारक ग्राहकास/खरेदीदारास त्यांचे ट्रेड नाव, पत्ता, अनुज्ञप्ती क्रमांक, दिनांक, परिमाण, दर, किंमत, व्हॅट तसेच ग्राहकाचे नाव व पत्ता इ. तपशिल नमुद असलेली कोणतीही रोख पावती/बिल देत नसल्याचे आढळून आले. रोख पावतीची स्थळ प्रत ठेवणे हे अनुज्ञप्तीधारकास बंधनकारक असतांना त्याने त्याचे उल्लंघन केल्याचे अधिकाऱ्यांना प्रथमदर्शनी दिसून आले. तसेच खाद्यतेल ज्या टाक्यांमध्ये साठविले जाते त्या टाक्यांवर आतमध्ये असलेल्या तेलाचे नाव नमुद नाही. गाळयाच्या दर्शनी भागी साठाफलक व भावफलक लावलेला नाही. परवानाधारकाने तपासणीच्या वेळी दिनांक ०८.०२.२०१३ रोजीचे वनस्पतीचे ३७५ किलोचे व दिनांक ०९.०२.२०१३ रोजीचे रिफाईंड तेल ३७५ लिटरचे खरेदी बिल तपासणीकरिता सादर केले नाही. तसेच त्यांच्याकडे असलेल्या खाद्यतेलाच्या किरकोळ परवान्यासाठी विहीत केलेल्या कमाल साठवणूक मर्यादेपेक्षा अतिरिक्त खाद्यतेलाची साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक केल्याने जीवनावश्यक वस्तु असलेल्या खाद्यतेलाची कृत्रीम टंचाई निर्माण होऊन स्थानीक बाजारपेठेत भाववाढीस प्रोत्साहन दिल्याचे सकृतदर्शनी दिसून आले. नोंद न ठेवता सुटे तेलाचा साठा करुन त्यामध्ये इतर तेलामध्ये पामोलीन तेल मिसळून, भेसळ करुन ग्राहकांना विक्री करीत असल्याचे प्रथम दर्शनी दिसून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याने, संबंधिताविरुध्द जोगेश्वरी पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ०३/२०१३, दिनांक १६/०२/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन एकुण ५,२३,८८५/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२३२० (ई), दिनांक २७/०९/२०१२ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१३ पर्यंत निर्बंध आहेत.

0010 महाराष्ट्र अनुसूचित वस्तु किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९७९ चे कलम २(j)(vi) अन्वये " retail dealer means- In relations to any edible oil, a person who, whether for commission, remuneration or otherwise carries on the business of selling any hydrogenated vegetable oil only or other edible oils only or both, stores them for sale in quantities exceeding fifteen quintals in the aggregate at any one time and sells them to any other persons for consumption and not for re-sale" असे नमूद आहे.

मे. राज ऑईल अँड सोप सेंटर या कंपनीच्यावतीने ते करीत असलेल्या खाद्यतेलाच्या किरकोळ व्यवसायाकरिता त्यांना महाराष्ट्र अनुसुचित वस्तू किरकोळ व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९७९ चे कलम २ २(j)(vi) अन्वये किरकोळ परवाना घेणें आवश्यक आहे. त्याअनुषंगाने, तपासणीच्या वेळी पथकास मे. राज ऑईल अँड सोप सेंटर या व्यवसायीक नावे अन्नधान्य, कडधान्य, खाद्यतेल व साखरेसाठी क्र. २६-ड-९ हा किरकोळ परवाना साठा मालक सलीम हाजीभाई अगवान यांनी धारण केल्याचे आढळून आले आहे. सदर तपासणीच्या वेळी नमुद पत्त्यावर एकूण ५६.८४ क्विंटल विविध खाद्यतेल/वनस्पतीचा सुटा व पॅकबंद डब्यांमधील साठा साठवणूक केल्याचे आढळून आले आहे. तथापी, मे. राज ऑईल अँड सोप सेंटरचे मालक यांनी सादर केलेले निवेदनाचे अवलोकन करता त्यांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे व या कार्यालयाची दिशाभूल करणारे आहे.

शासनाने महाराष्ट्र डाळी, खाद्यतेल विया आणि खाद्यतेल (साठा निर्बंध) आदेश (सुधारणा) आदेश, २०१० अन्वये पारित केलेल्या साठा मर्यादेच्या आदेशामध्ये खाद्यतेल (वनस्पती तेलासह) करीता महानगरपालिका क्षेत्रात घाऊक व्यवसायासाठी १००० क्विंटल तसेच किरकोळ व्यवसायासाठी ४० क्विंटल विहीत कमाल मर्यादा नमूद आहे.

उपरोक्त नमुद साठा मर्यादेच्या अनुषंगाने पारीत केलेल्या कमाल विहित मर्यादेनुसार मे. राज ऑईल अँड सोप सेंटरचे मालक यांनी १६.८४ क्विंटल खाद्यतेल/वनस्पतीचा साठा हा विहित कमाल मर्यादेपेक्षा अतिरिक्त साठवणूक केल्याचे आढळून आले. तथापी, सदरचा खाद्यतेल/वनस्पतीचा सुटा व पॅकबंद डब्यांमधील साठा हा प्रत्यक्षात हलविणे शक्य झाले नसल्याने तो जागीच जप्त करुन पुढील आदेशापर्यंत जतन करण्याच्या सुचना देऊन परवानाधारकाच्या ताब्यात देण्यात आला. तपासणीच्या वेळी परवानाधारकाने खाद्यतेलाच्या परवान्यावरिल अटी/शर्तीनुसार रोख विक्री पावती पुस्तक/विक्री नोंदवही ठेवलेली नाही, साठे साठेपुस्तकामध्ये परिपुर्ण नोंदी घेतलेल्या नाहीत. परवानाधारक ग्राहकास/खरेदीदारास त्यांचे ट्रेड नाव, पत्ता, अनुज्ञप्ती क्रमांक, दिनांक, परिमाण, दर, किंमत, व्हॅट तसेच ग्राहकाचे नाव व पत्ता इ. तपशिल नमुद असलेली कोणतीही रोख पावती/बिल देत नसल्याचे

तसेच गाळयाच्या दर्शनी भागी साठाफलक व भावफलक लावला नसल्याचे आढळून आले. ही गंभीर बाब आहे. यावरुन मे. राज ऑईल अँड सोप सेंटरचे मालक सलीम हाजीभाई अगवान यांनी त्यांच्याकडे असलेल्या खाद्यतेलाच्या किरकोळ परवानाच्या अटी व शर्तीचा भंग केल्याचे सिध्द होत आहे. तसेच किरकोळ परवान्यासाठी विहीत केलेल्या कमाल साठवणूक मर्यादेपेक्षा अतिरिक्त १६.८४ क्विंटल खाद्यतेल/वनस्तीची साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक केल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, मे. राज ऑईल अँड सोप सेंटर यांचा जप्त करण्यात आलेल्या खाद्यतेल/वनस्पतीच्या ५६.८४ क्विंटल साठ्यापैकी विहित कमाल मर्यादेच्या आत असलेला ४० क्विंटल साठा मुक्त करुन उर्वरीत अतिरिक्त असलेला १६.८४ क्विंटल साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये जोगेश्वरी पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ०३/२०१३, दिनांक १६/०२/२०१३ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या टाकी क्र. १ व २ तसेच विविध प्रकारच्या पॅकबंद डब्यांमधील एकूण ५६.८४ क्विंटल खाद्यतेल/वनस्पतीच्या साठ्यापैकी ४० क्विंटल साठा हा बंधपत्र घेऊन मुक्त करण्यात यावा.

२) उपरोक्त प्रमाणे ४० क्विंटल खाद्यतेल/वनस्पतीचा साठा मुक्त केल्यानंतर उर्वरीत १६.५६ क्विंटल खाद्यतेल/वनस्पतीचा संपूर्ण साठा हा शासनजमा करण्यात यावा.

३) सदर शासनजमा करण्यात आलेला १६.५६ क्विंटल खाद्यतेल/वनस्पतीचा साठा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळ, अंधेरी यांचे मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food,

Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

मे. राज ऑईल अँड सोप सेंटरचे मालक सलीम हाजीभाई अगवान
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, जोगेश्वरी पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, जोगेश्वरी पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.

२) उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळ, अंधेरी यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.

५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.